पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष:- 2024-2025

# समाजशास्त्र विभाग

प्राचार्य

डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख

प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

# वार्षिक अहवाल 2024- 2025

# समाजशास्त्र विभाग

समाजशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2024- 2025 मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले.

**प्रवेश व तासिका प्रारंभ:**

समाजशास्त्र विषयाला शैक्षणिक वर्ष 2024 - 25 मध्ये प्रवेशित विद्यार्थी संख्या बीए प्रथम वर्ष 49 , बीए द्वितीय वर्ष 38 , बीए तृतीय वर्ष 17 आणि मुख्य विषय समाजशास्त्र GE07 अशी होती. समाजशास्त्र विषयाच्या तासिका जूनच्या शेवटच्या आठवड्यात प्रारंभ झाल्या.

**कै. धुपाजी खोतकर पारितोषिक:**

महाविद्यालयात आयोजित सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळ उद्घाटन कार्यक्रमात दिनांक 5 सप्टेंबर 2024 रोजी कु. मनीषा भीमराव भालेराव या विद्यार्थिनीने शैक्षणिक वर्ष 2023 - 2024 मध्ये समाजशास्त्र मुख्य विषयासह प्रथम क्रमांक पटकाविला, त्याबद्दल तिला कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. दीपक भुसारे (अर्थशास्त्र विभाग प्रमुख, प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण) यांच्या हस्ते कै. धुपाजी खोतकर पारितोषिक देण्यात आले. ज्यात 1400 रुपयाचा चेक व प्रमाणपत्र देण्यात आले. कु. पूजा ढोके हीने समाजशास्त्र विषयात द्वितीय क्रमांक मिळविल्याबद्दल 400 रुपयाचा चेक देण्यात आला.

**अतिथि व्याख्यान:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 13 ऑगस्ट 2024 रोजी अतिथि व्याख्यानाचे आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले प्रा.श्रीनिवास मूंनगे सर (कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बदनापूर) त्यांनी 'समाजशास्त्र अभ्यास विषय व महत्त्व'.. या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 13 ऑगस्ट 2024 रोजी "सामाजीकरण" या विषयावरील केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा.श्रीनिवास मूंनगे, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. निर्मला वाघ आणि विभागाचे विद्यार्थी यांच्या हस्ते करण्यात आले.

**सेमिनार:**

समाजशास्त्र बी ए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे सेमिनार दिनांक 14 व 16 ऑक्टोबर 2024 रोजी घेण्यात आले. ज्यात प्रत्येकी 15 विद्यार्थी सहभागी झाले होते. सेमिनारचा विषय होता समाजशास्त्राचा उदय आणि समाजशास्त्रज्ञांचे योगदान.

**गटचर्चा:**

दिनांक 15 ऑक्टोबर 2024 रोजी समाजशास्त्र विभागातील बी ए प्रथम द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची महिला सुरक्षा या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. ज्यात 10 विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

**प्रात्यक्षिक परीक्षा:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 14 ऑक्टोबर 2024 रोजी कथा सांगणे हे प्रात्यक्षिक घेण्यात आले.
समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 16 ऑक्टोबर 2024 रोजी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे SWOC विश्लेषण करणे हे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

**डॉ. गोविंद घुर्ये यांची जयंती:**

समाजशास्त्र विभागाला डॉ. गोविंद घुर्ये यांचे नाव दिलेले असल्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त दिनांक 2 डिसेंबर 2024 रोजी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. अभिवादनास डॉ. मंजुषा नळगीरकर आणि विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. गोविंद घुर्ये यांच्या समाजशास्त्रातील योगदानाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

**अभ्यास सहल:**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री तसेच यशवंतराव चव्हाण कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय सिल्लोड यांच्यातील सामंजस्य करारा अंतर्गत अभ्यास सहलीचे तसेच सामाजिक सर्वेक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.समाजशास्त्र विषयातील वृद्धांच्या समस्या या विषयाची माहिती विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या प्रकारे व्हावी म्हणून दिनांक 13 जानेवारी 2025 रोजी नक्षत्रवाडी येथील मातोश्री वृद्धाश्रम येथेसमाजशास्त्र विभागाची अभ्यास सहल नेण्यात आली. विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील वृद्धांच्या सकाळच्या प्रार्थना पासून ते दुपारच्या जेवणापर्यंतच्या सर्व दैनंदिन दिनक्रमामध्ये सहभाग घेतला. वृद्धाश्रमात त्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व सोयी सुविधांचे निरीक्षण केले.

सदरील अभ्यास सहलीमध्ये "वृद्धाश्रमात राहणाऱ्या वृद्धांच्या समस्यांचा अभ्यास" मातोश्री वृद्धाश्रम नक्षत्रवाडी या विषयावरील सर्वेक्षण ज्यात 102 वृद्धांची माहिती मुलाखत अनुसूचित द्वारे संकलित करण्यात आली. माहिती संकलित करीत असताना विद्यार्थ्यांनी वृद्धांशी मनमोकळा संवाद केला. त्यांचे प्रश्न अडचणी व कौटुंबिक पार्श्वभूमी जाणून घेतली. मातोश्री वृद्धाश्रमाचे समन्वयक श्री सुनील पगोरे यांनी वृद्धाश्रमातील वृद्धांना दिला जाणाऱ्या सोयीसुविधांची माहिती दिली. तसेच हे वृद्ध व्यक्ती वृद्धाश्रमात कोणत्या कारणांमुळे आले आहेत किंवा आणले गेले आहेत याविषयी उदाहरणासह त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पगोरे सरांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, त्यांनी आपल्या घरातील वृद्ध व्यक्तींची काळजी घ्यावी. त्यांना आदर सन्मान द्यावा व त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात. सहलीचा मुख्य हेतूच हा होता की विद्यार्थ्यांनी वृद्धांच्या समस्या अभ्यासाव्यात व त्यांना वृद्धांच्या समस्यांची जाणीव व्हावी.सदरील अभ्यास सहलीत दोन्ही महाविद्यालयातील 40 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. डॉ. गंगाधर मोरे, प्रा. इंदू साळुंके आणि प्रा. निर्मला वाघ यांनी सहभाग घेतला.

**अतिथी व्याख्यान:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 14 फेब्रुवारी 2025 रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते प्रा. डॉ. गंगाधर मोरे (उपप्राचार्य व विभाग प्रमुख समाजशास्त्र विभाग यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड) हे लाभले होते. त्यांनी **सिनेमाचे समाजशास्त्र** या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 14 फेब्रुवारी 2025 रोजी **सिनेमाचे समाजशास्त्र** या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा. डॉ. गंगाधर मोरे, प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. निर्मला वाघ
आणि विभागाचे विद्यार्थी यांच्या हस्ते झाले.

**सामंजस्य करार :**

दिनांक 21 फेब्रुवारी 2025 रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री तसेच राजश्री शाहू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पाथ्री यांच्यातील समाजशास्त्र विभागाअंतर्गत शैक्षणिक वर्ष 2024- 2025 ते शैक्षणिक वर्ष 2028 - 2029 या पाच वर्षासाठीचा सामंजस्य करार करण्यात आला.

**गटचर्चा:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 7 मार्च 2025 रोजी **सिनेमाचे समाजशास्त्र** या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील गटचर्चेत 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सेमिनार:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 8 मार्च 2025 रोजी **महिला सबलीकरण** या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. सदरील सेमिनारमध्ये 10 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सामाजिक सर्वेक्षण:**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व यशवंतराव चव्हाण कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,सिल्लोड यांच्या समाजशास्त्र विभागाच्या सामंजस्य करारांतर्गत ( MOU) "वृद्धाश्रमात राहणाऱ्या वृद्धांच्या समस्यांचा अभ्यास" मातोश्री वृद्धाश्रम नक्षत्रवाडी या विषयावरील सर्वेक्षण जानेवारी 2025 मध्ये करण्यात आले. ज्यात 102 वृद्धांची माहिती मुलाखत अनुसूचित द्वारे संकलित करण्यात आली.

**पी.पी.टी तासिका:**

विभागाच्या वतीने अभ्यासक्रमाशी निगडित विविध विषयांवर 10 पी.पी.टी तासिका घेण्यात आल्या.

**सेंद्रिय शेती प्रमाणपत्र अभ्यासक्रम:**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2024 - 2025 मध्ये सेंद्रिय शेती प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला. सदरील अभ्यासक्रमासाठी 15 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. सेंद्रिय शेती अभ्यासक्रमाचा तासिका 1 ते 12 फेब्रुवारी 2025 या दरम्यान घेण्यात आल्या.

**राष्ट्रीय परिषद आयोजन:**

पी एम उषा प्रायोजित प्रस्तुत महाविद्यालय तसेच यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड आणि राजश्री शाहू महाविद्यालय पाथरी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 24 व 25 फेब्रुवारी 2025 रोजी दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेचा विषय होता "Transformation Of Social Institutions In India" (Issues, Challenges and Remedies). सदरील परिषदेत 119 अभ्यासकांनी सहभाग घेतला होता.

**अविष्कार स्पर्धेतील सहभाग व पारितोषिक:**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने दिनांक 8 ऑक्टोबर 2024 रोजी देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर येथे जिल्हास्तरीय अविष्कार स्पर्धेचे आयोजन केले होते. ज्यात समाजशास्त्र विभागाच्या वतीने कुमारी दिव्या थोरात व कुमारी वैष्णवी दाभाडे यांनी मानव्य विद्याशाखेतून "The Impact of Chemical Farming on Environment and Social Health" या विषयावरील भित्तिपत्रकाचे सादरीकरण केले. जिल्हास्तरावर महाविद्यालयाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्यामुळे महाविद्यालयाच्या संघाला विद्यापीठ स्तरावर जाण्याची संधी मिळाली. दिनांक 15 डिसेंबर 2024 रोजी विद्यापीठ स्तरीय अविष्कार स्पर्धेमध्ये संघाने सहभाग नोंदला व उत्कृष्ट सादरीकरण केले.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

## समाजशास्त्र विभाग

## कार्यक्रमाची छायाचित्रे

### कै. धुपाजी खोतकर पारितोषिक



दिनांक 5 सप्टेंबर 2024 रोजी कु. मनीषा भीमराव भालेराव या विद्यार्थिनी डॉ. दीपक भुसारे यांच्या हस्ते कै. धुपाजी खोतकर पारितोषिक देण्यात आले



**कु. पूजा ढोके हिला 400 रुपयांचा चेक देताना प्रा .डॉ. मंजुषा नळगीरकर**

# अतिथी व्याख्यान



दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी प्रा.श्रीनिवास मूंनगे सर यांनी 'समाजशास्त्र अभ्यास विषय व महत्त्व' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




दिनांक 14 फेब्रुवारी 2025 रोजी डॉ. गंगाधर मोरे यांनी सिनेमाचे समाजशास्त्र

या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# <u>भित्तीपत्रक प्रकाशन</u>




**दिनांक 13 ऑगस्ट 2024 रोजी "सामाजीकरण" या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना डॉ. श्रीनिवास मूंनगे**




**दिनांक 14 फेब्रुवारी 2025 रोजी सिनेमाचे समाजशास्त्र या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन करताना डॉ. गंगाधर मोरे**

## गटचर्चा




दिनांक 15 ऑक्टोबर 2024 विषय: महिला सुरक्षा

## सेमिनार




दिनांक 14 ऑक्टोबर 2024 विषय: समाजशास्त्राचा उदय आणि समाजशास्त्रज्ञांचे योगदान

## गटचर्चा




दिनांक 7 मार्च 2025 विषय: सिनेमाचे समाजशास्त्र

## सेमिनार



दिनांक 8 मार्च 2025 विषय: महिला सबलीकरण

## अभ्यास सहल

दिनांक 13 जानेवारी 2025 "मातोश्री वृद्धाश्रम"






अभ्यास सहलीत सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक     मातोश्री वृद्धाश्रमाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देताना श्री सुनील पगोरे

## बातमी



दिव्य मराठी — छत्रपती संभाजीनगर जिल्हा 23-01-2025

### मातोश्री वृद्धाश्रमामध्ये अभ्यास सहल

प्रतिनिधी | सिल्लोड

येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांच्या सामंजस्य कराराअंतर्गत समाजशास्त्र विभागामार्फत एकदिवसीय अभ्यास सहल व क्षेत्र सर्वेक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील नक्षत्रवाडी परिसरातील मातोश्री वृद्धाश्रमाला भेट देऊन तेथील १२० वृद्ध स्त्री - पुरुषांची अनुसूची प्रश्नावलीद्वारे प्रश्न विचारसरणीचे वस्तुनिष्ठ तथ्याचे संकलन करण्यात आले.

या वेळी महाविद्यालयातील एकूण ४० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन वृद्धाश्रमातील वृद्धांना भेटून त्यांची माहिती संकलित केली. वृद्धाश्रमात येण्याची कारणे, वृद्ध आश्रमातील सुविधा, वृद्धाश्रमातील इतर वृद्धासोबत राहताना येणारा अनुभव याचबरोबर कुटुंबाविषयी असलेले मत व अपेक्षा या बाबी जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांनी प्रश्न, उत्तर स्वरूपात आजी-आजोबांची मानसिक स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी जवळपास ९०% आजी, आजोबांना वृद्धाश्रमात भरपूर सुविधा आहेत जसे की चहा, नाष्टा, जेवण, कपडे, निवास व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मनोरंजनाचे कार्यक्रम, धार्मिक सहली, वैद्यकीय सर्व सोयी सुविधा असल्या तरी कुटुंबातील मुलं, नातवंडे सोबत राहावे, असे त्यांना वाटते. इथे वृद्धाश्रमात करमत नाही, पण घरच्या व्यक्तीने इथे आणून सोडले म्हणून राहावे लागते, अशा अत्यंत हृदयस्पर्शी भावना त्यांनी व्यक्त केल्या.

मातोश्री वृद्धाश्रमात अभ्याससहल प्रसंगी सहभागी विद्यार्थी आणि महाविद्यालयाचे शिक्षक.



दैनिक माझा मराठवाडा — शब्दांना सत्याची साथ ! हक्काचे दैनिक तुमच्या हातात..!

शुक्रवार 24 जानेवारी 2025 — संपादक - दशरथ एन. मुरडकर.

वर्ष २ रे • अंक २८२ वा • पाने-४ • छत्रपती संभाजीनगर • किमत-५ रु. • RNI No.MAHMAR/2023/84326

### मातोश्री वृद्धाश्रमात अभ्याससहल व क्षेत्र सर्वेक्षण.

माझा मराठवाडा
संजय दांडगे.

सिल्लोड: यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड आणि श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांच्या सामंजस्य करारा अंतर्गत (M O U) समाजशास्त्र विभागामार्फत एकदिवशीय अभ्यास सहल व क्षेत्रसर्वेक्षणाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील नक्षत्रवाडी परिसरातील मातोश्री वृद्धाश्रमाला भेट देऊन तेथील 120 वृद्ध स्त्री - पुरुषांची अनुसूची प्रश्नावली द्वारे प्रश्न विचारसरणीचे वस्तुनिष्ठ तथ्याची संकलन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील एकूण 40 विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन वृद्धाश्रमातील वृद्धांना भेटून त्यांची माहिती संकलित केली. वृद्धाश्रमात येण्याचे कारणे, वृद्ध आश्रमातील सुविधा, वृद्धाश्रमातील इतर वृद्धासोबत राहताना येणारा अनुभव याच बरोबर कुटुंबाविषयी असलेले मत व अपेक्षा या बाबी जाणून घेतल्या. विद्यार्थ्यांनी प्रश्न उत्तर स्वरुपात आजी-आजोबांची मानसिक स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी जवळपास 90% आजी आजोबांना वृद्धाश्रमात भरपूर सुविधा आहेत जसे की चहा, नाश्ता, जेवण, कपडे, निवास व्यवस्था, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मनोरंजनाचे कार्यक्रम, धार्मिक सहली, वैद्यकीय सुविधा यासारख्या सर्व सोयी सुविधा असल्या तरी कुटुंबातील मुलं नातवंडे सोबत राहावे असे त्यांना वाटते. इथे वृद्धाश्रमात करमत नाही पण घरच्या व्यक्तीने इथे आणून सोडले म्हणून राहावे लागते अशा अत्यंत हृदयस्पर्शी भावना त्यांनी व्यक्त केला. ज्या मुलांना लहानपणी आजारपणात सांभाळून स्वतः कष्ट करून त्यांना सुखात ठेवण्यासाठी दिवस रात्र कष्ट करणार आई-वडिलांना मात्र शरीर थकल्यानंतर सांभाळ न करणारी ही मानसिकता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अशा एका गंभीर व ज्वलंत कौटुंबिक सामाजिक समस्या विषयी विद्यार्थ्यांना जाणीव व्हावी व प्रत्यक्ष ज्ञान याविषयी त्यांना मिळावे आणि विद्यार्थ्यांना आपल्या आई- वडिलांविषयी जबाबदारीची जाणीव या माध्यमातून करण्याचा प्रयत्न या सर्वेक्षणाच्या माध्यमातून करण्यात आला. खरंच वृद्धाश्रमाची गरज आहे का असा प्रश्न प्रत्येकाला पडल्याशिवाय राहत नाही अशा एका सामाजिक समस्येवर तरुण पिढीने समाजातील प्रत्येक घरांनी गांभीर्याने विचार करावा. या शैक्षणिक अभ्यास सहल व सर्वेक्षणासाठी समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.जी.एन मोरे, मंजुषा नळगीरकर. प्रा. आय.सी साळुंके, प्रा. निर्मला वाघ यांच्यासह एकूण 40 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या सामाजिक जनजागृती पर अभ्यासक्रम सहल सर्वेक्षणासाठी डॉ. अशोक पंडित यांनी मार्गदर्शन करून असे उपयुक्त कार्यक्रम घेण्यासाठी प्रोत्साहन केले. मातोश्री वृद्धाश्रमामध्ये केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर इतर राज्यातील वृद्धांना सोडलेले पहावयास मिळाले. या वृद्धाश्रमातील व्यवस्थापक सागर पगोरे यांनी वृद्धाश्रमाची स्थापना, वृद्धाश्रमातील सुविधा, आजी आजोबा वृद्धाश्रमात वृद्धांना सोडण्याची कारणे याविषयी सखोल अशी माहिती दिली. त्यावेळी प्रत्येक विद्यार्थी भावनिक झाले होते. या सर्वेक्षणानंतर समाज बांधवांना एकच आव्हान करावेसे वाटते की जर आपण आपल्या आई-वडिलांचा सांभाळ केला तर आपली मुलं आपला सांभाळ करतील आज तुम्ही सुखात आहात परंतु ही वेळ जायला वेळ लागणार नाही या गंभीर प्रश्नाविषयी विचार करावा या जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांना सर्वेक्षणातून करता आली.

# सामाजिक सर्वेक्षण

**दिनांक 13 जानेवारी 2025 : "वृद्धाश्रमात राहणाऱ्या वृद्धांच्या समस्यांचा अभ्यास"**





**वृद्धाश्रमातील आजोबांकडून माहिती घेत असताना विद्यार्थी**





**वृद्धाश्रमातील आजींकडून माहिती घेत असताना विद्यार्थिनी**

## गोविंद घुर्ये यांची जयंती



2 डिसेंबर 2024 रोजी डॉ. गोविंद घुर्ये यांच्या विषयी माहिती देताना यांच्या विषयी माहिती देताना बीए द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी कु. दिव्या थोरात



**सामंजस्य करार प्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. सुनील मिरगणे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, डॉ. राजू पोपळघट, प्रा .डॉ. मंजुषा नळगीरकर आणि अन्य प्राध्यापक**

**प्रात्यक्षिक परीक्षा**



**कथा सांगताना आरती शेजुळ**



स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे SWOC विश्लेषण करताना सुरज हरकळ

जिल्हास्तरीय अविष्कार स्पर्धा- दिनांक 8 ऑक्टोबर 2024







देवगिरी महाविद्यालय येथे आयोजित जिल्हास्तरीय अविष्कार स्पर्धेत सहभागी विद्यार्थिनी कु. वैष्णवी दाभाडे व कु. दिव्या थोरात

विद्यापीठ स्तरीय अविष्कार स्पर्धा - दिनांक 15 डिसेंबर 2024



भित्तीपत्रकाचे  सादरीकरण करताना कु. वैष्णवी दाभाडे

